# कि.दि.अ.क.१०४/२०१३ मध्ये नि.४६ लगत आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज आणि त्यावरील अर्जदाराचे म्हणणे वाचले. दोन्ही विद्वान वकीलांनी जोरदारपणे मांडलेला युक्तिवाद ऐकला.

२) प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराचे उलटतपासाकरीता प्रलंबित आहे. हा अर्ज सन २०१३ साली दाखल करणेत आलेला आहे. या अर्जाचे कामी गैरअर्जदारातर्फे विविध अर्ज देवुन हा अर्ज चालणेस पात्र नाही अथवा या न्यायालयास हा अर्ज या घटकेला चालविता येत नाही अशा प्रकारे अर्ज दाखल करणेत आले होते आणि ते गुणदोषावर फेटाळणेत आलेले आहेत. मागील तारखेस नि.३९ व ४२ येथे दाखल अर्ज निकाली काढणेत आलेले आहेत. आज रोजी या अर्जासोबत कोणताही वैद्यकीय दाखला दाखल करणेत आलेला नाही. त्याच बरोबर नि.७ येथे दाखल गैरअर्जदारातर्फेचे वकीलपत्र वाचता या अर्जावर सही करणार श्री.एस.आर.निमगावकर विधीज्ञ यांची सुध्दा गैरअर्जदारांकरीता विधीज्ञ म्हणुन नेमुणक आहे. या सर्व कारणांमुळे या अर्जात कोणतेही कायदेशीर तथ्य दिसुन येत नाही. म्हणुन हा अर्ज फेटाळणेत येत आहे.

स्वाक्षरीत/-
( शौ. रा. फकीर )
दिवाणी न्यायाधीश व स्तर,
माजलगांव.

माजलगांव.
दि.१६-६-२०१६